एस.सी.आर. सर्वोच्च न्यायाल्याचे अहवाल ५१३/१९५२

दिनांक ०७ मार्च, १९५२

महंत प्रागदासजी गुरु भगवानदासजी

विरुद्ध

पटेल ईश्वरलालभाई नरसीभाई आणि इतर

(सय्यद फझल अली, मुखर्जी आणि विविअन बोस जे.जे.)

न्यायलयाने असे ठरविले आहे की, दिवाणी प्रक्रिया संहिता चे कलम ९२ अंतर्गत दावा हा एक विशेष स्वरूपाचा दावा आहे की ज्यामध्ये धार्मिक किंवा धर्मदाय स्वरूपाच्या सार्वजनिक न्यास मंडळाचे अस्तित्व गुर्हीत धरल्या जाते मात्र जेव्हा अशा विश्वसात मंडळाचा भंग होतो किंवा त्याच्या प्रशासनासाठी न्याय्ल्याचे निर्देश आवश्यक असतात तेंव्हाच तो दावा चालू शकतो मात्र त्या कलमात विशेषतः नमूद केलेल्या एक किंवा अधिक बाबींसाठी मागणी केलेली असली पाहिजे. म्हणूनच ज्यावेळेला न्यायालयांना एक समयावच्छेदेकरून असे आढळले की विश्वासघाताचे आरोप शाबित केले गेले नाहीत आणि न्यासाच्या योग्य प्रशासनासाठी देखील न्यायालयाचे कोणतेही निर्देश मागितले गेलेले नाहीत, त्यामुळे कलम ९२ अंतर्गत दाव्याचा पायाच रचला गेलेला नाही आणि वादींकडे त्यंच्या दाव्यासाठी कोणतेही दाव्याचे कारण नव्हते आणि अशा परिस्थितीत उच्च न्यायालयाची घोषणा की संबंधित न्यास हा सार्वजनिक न्यास आहे,

हि महत्वाची नसून ते केवळ एक मत प्रदर्शन होते व ते दावा फेटाळण्याचे हुकुम्नाम्यातून हटवले गेले पाहिजे.

दिवाणी अपील अधिकारीता : दिवाणी अपील क्रमांक ९९/१९५१, मुंबई उच्च न्यायालय, मुंबई (मुख्य न्यायमूर्ती जे. स्टोन आणि जे. दीक्षित) यांच्या, प्रथम अपील क्रमांक १२८/१९४३ दिनांक १४ जुलै १९४७ च्या न्यायनिर्णय व हुकूमनामा विरुद्ध, ज्याद्वारे कायरा नडीयाद येथील जिल्हा न्यायाधीश यांनी दिवाणी दावा क्रमांक १५/१९२८ मध्ये दिनांक १४ ऑक्टोबर १९४२ रोजी पारित केलेला हुकूमनामा कायम करणेत आला, यांच्या निकालाविरुद्ध.

न्यायमूर्ती मुखर्जी :- हे अपील मुळ प्रतिवादी तर्फे दाखल केले असून ते मूळ ९ वादींनी दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ९२ अंतर्गत जिल्हा न्यायाधीश कायरा नडीयाद यांचे न्यायालयात दाखल केलेल्या दाव्यातून उद्भवलेले आहे. मूळ ९ वादींपैकी आता केवळ एकच वादी जिवंत आहे आणि तो या अपिलात एकच उत्तरवादी आहे उर्वरित सर्व वादी या १९२८ साली सुरु करणेत आलेल्या प्रलंबित खटल्या दरम्यान मृत्यू पावले आहेत.

वादींची केस थोडक्यात अशी होती की, एक कुबेरदास, जो धार्मिक गुरु आणि पावन पुरुष, होता त्याने एक कैवल्य किंवा करुणासागर या नावाने एक पंथ सुरु केला. त्या पंथाचे प्रमुख धर्मतत्त्व असे आहे की, अनंताची जाणीव हि फक्त गुरूंच्या किंवा

अध्यात्मिक उपदेशकाच्या मार्फतच शक्य आहे. कुबेरदासला त्याचे अनुयायी व शिष्य यांचेकडून पैसा आणि जमिनी मिळाल्या व त्या मिळकतीतून त्याने सारसा येथे एक मंदिर बांधले. कुबेरदासने आपल्या मृत्युपत्राने त्याचा प्रमुख शिष्य नारायणदास ह्यास त्याच्या गादीचा वारस नेमला. नारायणदासने दुसरे आणि मोठे मंदिर बांधले आणि त्यात कुबेरदास ची मूर्ती आणि त्याच्या दोन्ही बाजूस दोन सेवक वर्गांच्या मूर्तींची स्थापना केली. नारायणदास नंतर बलदेवदास, भगवानदास आणि प्रागदासजी, जो या दाव्यात प्रतिवादी आहे, हे महंत झाले. हे सर्व त्यंच्या पुर्वाधीकारयाने लिहून ठेवलेल्या मृत्यू पत्राद्वारे महंत झाले. प्रतिवादी विरुद्ध असा आरोप केला आहे की, तो सदर संस्थेच्या रितीरिवाजा विरुद्ध वागत होता व असंयम, न्यासाच्या मालमत्तेचे गैरव्यवस्थापन, तिची अयोग्य विल्हेवाठ लावणे आदि कृत्यांचा दोषी होता. असे आरोप प्रतिवादी विरुद्ध करत वादींनी दाव्यामध्ये अशी मागणी केली की,

1) दाव्याच्या अनुसूची मध्ये वर्णन केलेल्या मिळकती तसेच प्रतिवादी व्यवस्थापना खालील इतर मालमत्ता धार्मिक व धर्मदाय न्यासाच्या आणि कैवल्य किंवा करुणासागर पंथाच्या मालकीच्या असल्याचे घोषित केले जावे.
2) प्रतिवादीला गादीवरून आणि मालमत्तेच्या ताब्यातून काढून टाकावे आणि त्याच्या जागी योग्य उत्तराधिकारी महंत नियुक्त करावा.

3) प्रतिवादीस त्याचे न्यासाचे व्यवस्थापन कालावधी दरम्यानचे सर्व हिशोब दाखल करण्यास सांगावे आणि

4) न्यासाच्या योग्य व्यवस्थापनासाठी योजना आखली जावी.

प्रतिवादीने त्याच्या लेखी जबाबात वादपत्रातील सर्व आरोप फेटाळले आणि वाद मिळकती ह्या स्वतःची खाजगी मालमत्ता असून त्यांचे स्वरूप कधीही धार्मिक किंवा धर्मादाय किंवा सार्वजनिक असे नसल्याचे आणि दावाच चालणेस पत्र नसल्याचे म्हणणे मांडले.

अशा पक्ष कथनानवरून जिल्हा न्यायधीश यांनी बरेच मुद्दे निश्चित केले, ज्या पैके खालील दोन मुद्दे प्राथमिक मुद्दे म्हणून प्रथम निर्णयाकरिता घेण्यात आले.

1) मंदिर आणि दावा मालमत्ता सार्वजनिक धर्मदाय मालमत्ता आहेत का ? आणि

2) नसेल तर ह्या न्यायालयाला खटल्याची सुनावणी करण्याचा अधिकार दावा आहे का ?

जिल्हा न्यायाधीश यांनी, दिनांक १८ जुलै १९३५ रोजी दिलेल्या निकालानुसार वादींविरुद्ध त्या दोन्ही मुद्द्यांचा न्यायनिर्णय दिला आणि दावा फेटाळला. या निर्णयाविरोधात वादींनी मुंबई उच्च न्यायालयात अपील दाखल केले. अपिलचा

सुनावणी घेणाऱ्या उच्च न्यायालयाच्या विद्वान न्यायधीश यांनी असा दृष्टीकोन अंगीकारला की, दावा मिळकतीची मागणी, सदर संस्थेची निगरानी केवळ अशाच उद्देशाने करावी की ते उद्देश सार्वजनिक धर्मदाय उद्देश स्वरूपाचे असावेत, अशा बंधनामुळे इतकी नियंत्रित होते की त्यामुळे तो दावा दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ९२ खाली येतो असे धरावे लागेल त्याचा परिणाम असा झाला की, खालील न्यायालयाचा निकाल रद्दबातल करणेत आला आणि तो दावा खालील न्यायलयात नव्याने पुन्हा सुनावणी घेण्याकरीता पाठविण्यात आला. उच्च न्यायालयाचा हा निकाल दिनांक २४ जानेवारी १९३८ चा आहे.

या आदेशामुळे व्यथित झालेल्या प्रतिवादीने न्यायिक समिती कडे अपील दाखल करण्यास परवानगी मागितली परंतु हा अर्ज नाकरण्यात आला. त्यानंतर प्रतिवादीने प्रीव्ही कौन्सिल समोर विशेष परवानगी अर्ज दाखल केला परंतु प्रीव्ही कौन्सिलने देखील सदरची परवानगी प्रकरण अंतरिम टप्प्यावरती असल्याच्या कारणावरून नाकारली. तथापि, सदरची परवानगी नाकारताना प्रीव्ही कौन्सिलने हे स्पष्ट केले की, सदरचा आदेश वादातील सर्व मुद्द्यांवर झालेल्या निकालावर पुन्हा अपील दाखल करण्याच्या अधिकाराच्या आड येणार नाही. त्यानंतर सदरची केस पुन्हा जिल्हा न्यायाल्याकडे गेली आणि उभय पक्षांनी दिलेल्या पुराव्यावरून जिल्हा न्यायाधीशांनी असा निष्कर्ष काढला की, गैरवर्तणूक आणि विश्वासघाताचे आरोप,

वादींनी शाबित केलेले नाहीत आणि त्यामुळे त्यांनी तो दावा नामंजूर केला. तथापि, दावा नामंजूर करत असताना उच्च न्यायालयाने आधी दिलेला निकाल की, मंदिर आणि प्रतिवादीच्या ताब्यात असलेल्या मालमत्ता या सार्वजनिक, धार्मिक आणि धर्मदाय उद्देशाच्या आहेत या निकालाला अधीन राहून तो दावा नामंजूर करणेत आला. ह्या निकालाविरुद्ध वादींनी मुंबई उच्च न्यायालयामध्ये अपील दाखल केले आणि उच्च न्यायलयाने आपल्या दिनांक १४ जुलै १९४७ च्या निकालाने तो निकाल कायम केला आणि अपील फेटाळून लावले.

प्रतिवादी आता उच्च न्यायालयाने दिलेल्या दाखल्यावरून या न्यायालयात आलेला असून जरी वरकरणी हे अपील उच्च न्यायालयाने दिनांक १४ जुलै १४७ पारित केलेल्या अंतिम हुमुकनाम्याविरुद्ध दिसत असले तरी पदार्थात ह्या अपिलात उच्च न्यायालयाचा दिनांक २४ जानेवारी १९३८ चा प्रकरण खालील न्यायालयाकडे पुन्हा चालवण्याच्या आदेशच्या औचित्याला आव्हान दिलेले आहे. त्या आदेशाद्वारे उच्च न्यायालयाने जिल्हा न्यायाधीशांनी पारित केलेला दावा खारीज करणारा हुकूमनामा रद्दबातल ठरविला होता व दाव्यातील मालमत्ता या सार्वजनिक धर्मदाय न्यासाच्या मालमत्ता असून धार्मिक आणि धर्मदाय स्वरूपाचा आहेत असे मत प्रदर्शित केलेले होते.

श्री. दप्तरी यांनी अपिलार्थीच्या बाजूने युक्तिवाद करत असताना आमचे समोर असे कथन केले की, दावा मिळकतीच्या बाबतीत सार्वजनिक न्यास लागू पडतो किंवा नाही याबाबतचा खालील न्यायालायाचा निष्कर्ष हा योग्य होता व त्याबाबतचा उच्च न्यायालयाचा निष्कर्ष हा अभिलेखावरील पुराव्यचा चुकीचा अर्थ काढल्यामुळे लावला गेला.

उभाव पक्षांच्या विद्वान वकिलांनी आमच्या समोर अभिलेखावरील संपूर्ण पुराव्याचे विवेचन केले परंतु आम्ही निष्कर्ष येथून पुढे काढणार आहोत. त्याकरिता दावा मिळकती या सार्वजनिक धर्मदाय न्यासाच्या आहेत किंवा नाही याबद्दलचा कोणताही निष्कर्ष काढणे अप्रस्तुत ठरणार आहे असे आमचे मत आहे. आमच्या मते ज्या वेळेला खालच्या उभय न्यायालयांनी एक समयावच्छेदेकरून, केसचा गुणावगुणावरून त्यासंदर्भात निर्णय घेतला आहे त्यामुळे तो प्रश्न दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ९२ च्या कक्षेबाहेर गेला आहे आणि त्यायोगे वादीला केवळ मालमत्तेच्या स्वरूपाबद्दल निव्वळ जाहीरनामा देऊन तो हुकुमनाम्याचा एक भाग करता येत नाही जरी दावाच खारीज झाला असेल तरी.

दिवाणी प्रक्रिया संहिता च्या कलम ९२ खालील दावा हा विशिष्ट स्वरूपाचा दावा असतो. त्यामध्ये सार्वजनिक न्यासाचे स्वरूप हे धार्मिक किंवा धर्मदाय असल्याचे गृहीत धरलेले असते अशा प्रकारचा दावा केवळ विश्वासघाताचा आरोप किंवा सदर न्यासाच्या प्रशासानाकरिता न्यायालयाकडून काही सूचना जरुरी असल्यासच दाखल

केल्या जाऊ शकतो आणि अशा दाव्यात त्या कलमात विशेषतः नमूद केलेल्या एक किंवा अधिक मागण्याच केवळ मागितल्या जाऊ शकतात. ज्या वेळेला ह्या अटी पूर्ण केल्या जातात त्यावेळी फक्त आणि फक्त अशाच वेळी दिवाणी प्रक्रिया संहिताच्या कलम ९२ खाली दावा दाखल केला जाऊ शकतो. प्रीव्ही कौन्सिलने ***अब्दुर रहीम विरुद्ध बरकत अली (१)*** म्हटल्या प्रमाणे एखादी मालमत्ता धर्मदाय न्यासाची मालकीची आहे असा दावा हा सर्व साधारण कायद्यानुसार दाखल होऊ शकतो पण असा दावा दिवाणी प्रक्रिया संहिताच्या कलम ९२ च्या कक्षे बाहेरचा आहे. आमच्या समोर असलेल्या केस मध्ये मागण्यात आलेल्या मागण्या या निसंशय दिवाणी प्रक्रिया संहिताच्या कलम ९२ शी संबंधित आहेत आणि दावा ह्या धरणेवरून चालला की प्रतिवादी जो सार्वजनिक न्यासाचा एक विश्वस्त आहे तो विश्वासघाताचा दोषी आहे. प्रतिवादीने न्यास असल्याचेच नाकबूल केले आणि पुढे तो काही गैरवर्तुनुकीचा किंवा काही विश्वासघाताचा दोषी आहे हे आरोप देखील त्याने नाकारले. प्रतिवादीचे हे नाकारणे, न्यायालयाचा न्यायाधिकार खचितच हिरावून घेत नव्हता परंतु ज्यावेळेला खालील न्यायालयांनी एक समयावच्छेदेकरून, समोर आलेल्या व उभाव पक्षकारांनी दिलेल्या पुराव्यावरून असे ठरवले की, विश्वासघाताचा आरोप शाबित झालेला नाही आणि ज्या अर्थी वादींची अशी केस नव्हती की सदर न्यासाच्या योग्य प्रशास्नाकरिता न्यायालयाच्या काही सूचना आवश्यक आहेत, अशा वेळेला दिवाणी प्रक्रिया संहिता च्या कलम ९२ अंतर्गत दाव्याचा पायाच या प्रकरणी नाहीसा होता आणि वादींना दावा

दाखल करण्याकरिता काहीच दाव्याचे कारण नव्हते. अशा परिस्थितीत उच्च न्यायालयाचे निष्कर्ष की, सदर न्यास हा सार्वजनिक न्यास होता, हे संपूर्णतः अप्रस्तुत होते आणि ज्या कारणांवरून दावा प्रत्येक्षात फेटाळला गेला होता त्या कारणांशी संबंधित नव्हते आणि त्यामुळे ते निष्कर्ष हुकूमनामा किंवा अंतिम आदेश ह्यांचा भाग, वादींच्या हक्कात जाहीरनाम्याच्या स्वरुपात होऊ शकत नव्हते. उत्तरवादींच्या विद्वान वकिलांकडून असा युक्तिवाद करणेत आला की, जरी वादी वाद्पत्रातील इतर आरोप शाबित करण्यात यशस्वी झालेले नसले तरी ते मालमत्ता हि सार्वजनिक आणि धर्मदाय न्यासाची मालमत्ता आहे हे शाबित करण्यास यशस्वी ठरले आहेत जी बाब प्रतिवादीने नाकबूल केलेली आहे. अशा परिस्तिथीत वादींना त्यांनी केलेल्या प्रत्येक्ष मागणीपेक्षा कमी महत्वाची मागणी मंजूर करण्यामध्ये खालील न्यायालयाने कोणतीही चूक केलेली नाही. ह्याला उत्तर असे आहे की, दिवाणी प्रक्रिया संहिताच्या कलम ९२ खाली दाखल करणेत आलेल्या दाव्यामध्ये वादी केवळ त्याच मागण्या मागू शकतो आणि न्यायालय केवळ त्याच मागण्या मंजूर करू शकते की ज्या विशेषेकरून त्या कलमातील विविध उप्कलमात नमूद केलेल्या आहेत. दावा मिळकती ह्या न्यासाच्या मिळकती आहेत हा जाहीरनामा मिळण्याची मागणी त्या कलमाच्या कोणत्याही उपकलमात बसत नाहीत. या वेळेला प्रतिवादी एखाद्या न्यासाचे अस्तित्वच नाकारतो त्यावेळेला न्यास अस्तित्वात आहे असा जाहीरनामा ही मूळ मागणीची पूरक मागणी होऊ शकते, जर वादी मूळ मागणी मिळण्यास पत्र असेल तर. पण ज्या वेळेला वादी दाव्यास कारण

नसल्याकारणाने दाव्यातील मागणी मिळण्यास पत्र नसेल तर त्याला कोणतेही जाहीरनामा देणारी मागणी दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ९२ खाली मागण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. अशा परिस्तिथी मध्ये सार्वजनिक न्यासाच्या अस्तित्व बद्दलचे निष्कर्ष केवळ एक मतप्रदर्शन असू शकते त्यापेक्षा जास्त नाही आणि ते दाव्याचे अंतिम ठरव होऊ शकत नाही. परिणामतः आमच्या मतानुसार उच्च न्यायालायाचा न्यायनिर्णय हा बदलणार नाही परंतु खालील न्यायालयाने पारित केलेला न्यायनिर्णय व हुकूमनामा जो उच्च न्यायालयाने अपिलात कायम केला आहे. ह्यामध्ये वादीचा दावा दावा मिळकतीच्या स्वरूपाबद्दल कोणत्याही जाहीरनाम्याशी संबंधित न ठेवता सरसकट दावा खारीज करण्याचा आदेश करण्यात येईल. या हदीपर्यंत अपील मंजूर करणेत आलेले असून अंतिम हुकूमनामा सुधारित करणेत आलेली आहे. खर्चाबाबतचे खालील न्यायालयाने पारित केलेले आदेश कायम करणेत आलेले आहेत. ह्या अपिलातील प्रत्येक पक्षकार आपला खर्च आपण सोसणार आहे.

अपील मंजूर

अपिलार्थी करिता अभिकर्ता गणपत राय

उत्तर्वादी करिता अभिकर्ता के.जे. काळे

अस्वीकरण

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

x-x-x-x